मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४९३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दिनांक ६ ऑक्टोंबर २०२३। पान १

# धोकादायक वीज वाहिन्या होणार भूमिगत!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांनी घेतला पुढाकार

**मोशी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** उघड्या वरील उच्चदाब आणि लघुदाब वीजवाहिन्यांमुळे रुपीनगर, तळवडे भागात शॉर्ट सर्किट अथवा नागरिकांचा स्पर्श झाल्यामुळे अपघाताच्या घटना समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर या परिसरातील वीज वाहिन्या भूमिगत करण्यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला. त्यानुसार, वीज वाहिन्या भूमिगत करण्याचे काम सुरू झाले आहे. रुपीनगर येथील विकास सोसायटीमध्ये विक्रम हिवरे यांच्या घरी शॉर्टसर्किट झाले. उघड्यावरील वीज वाहिन्यांमुळे रहिवाशांच्या जीवतास धोका आहे. त्यामुळे माजी नगरसेवक शांतराम भालेकर आणि सहकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. अशा घटना पुन्हा घडू नयेत. या करिता आमदार महेश लांडगे यांनी लक्ष घालावे, अशी मागणी केली होती. याची तात्काळ दखल घेत महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांशी बैठक घेण्यात आली. त्यानंतर दोनच दिवसांत वीज वाहिन्या भूमिगत करण्याचे काम सुरू करण्यात आले.




### दोन दिवसांत घेतले काम

» वीजवाहिन्या उघड्यावर असल्यामुळे शॉर्ट सर्किट होवून एका मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती. स्थानिक नागरिकांमध्ये वीज वाहिन्यांमुळे भीतीचे वातावरण होते. महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांशी बैठक घेण्यात आल्यानंतर महावितरण प्रशासनाने दोनच दिवसांत तात्काळ काम हाती दोनच दिवसांत वीज वाहिन्या भूमिगत करण्याचे काम सुरू करण्यात आले.

माजी नगरसेवक शांताराम भालेकर, माजी स्वीकृत नगरसेवक पांडुरंग भालेकर, रमेश भालेकर, सोमनाथ मेमाणे, भाऊसाहेब काळोखे, सामाजिक कार्यकर्ते संदीप जाधव, अस्मिता भालेकर, शिरीष उत्तेकर, राहुल पिंगळे, रवी शेतसंधी आदी उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, भोसरी विधानसभा मतदार संघातील तळवडे येथे विविध गृहनिर्माण सोसायटी, रुपीनगर येथील हनुमान मंदिर ते काळे महाराज मंदिर दरम्यान महावितरणच्या उच्चदाब व लघुदाब वाहिन्या भूमिगत करण्याचे काम हाती घेण्यात आले. वीजवाहिन्या उघड्यावर असल्यामुळे शॉर्ट सर्किट होवून एका मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती. स्थानिक नागरिकांमध्ये वीज वाहिन्यांमुळे भीतीचे वातावरण होते. त्यामुळे महावितरण प्रशासनाने तात्काळ काम हाती घ्यावे, अशी सूचना केली होती.

# पिंपरी न्यायालयात वकिलांची नेत्र तपासणी

## १२० वकील बांधवांची घेतला नेत्र तपासणी शिबीराचा लाभ

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी न्यायालयात पिंपरी चिंचवड ॲडव्होकेटस् बार असोसिएशन व ईशा नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. ४) नेत्र तपासणी शिबीर घेण्यात आले. यामध्ये १२० वकील बांधवांची नेत्र तपासणी करण्यात आली. यावेळी बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. नारायण रसाळ, महिला सचिव ॲड. प्रमिला गाडे, ऑडिटर ॲड. राजेश रणपिसे, सहसचिव ॲड. मंगेश नढे, सदस्य ॲड. प्रशांत बचुटे, ॲड. नितीन पवार, ॲड. बाजीराव दळवी, माजी अध्यक्ष ॲड. छाजेड, ॲड. सुनील कडुसकर, माजी उपाध्यक्ष ॲड. प्रतिक जगताप, ॲड. गौरव वाळूंज, ॲड. रामराजे भोसले, ॲड. सुनील दातीर, ॲड. लाळगे पाटिल, ॲड. गोरख कुंभार, ॲड. संतोष मोरे, ॲड. श्रीमती रायते, ॲड. स्नेहा कांबळे, ॲड. गीतावली जाधव, ॲड. सविता तोडकर, ॲड. जयश्री कोंद्रे, ॲड. ऐश्वर्या शिरसाठ, ॲड. निलम जाधव आदी उपस्थित होते. नेहरूनगर, पिंपरी येथील न्यायालयातील बार रूममध्ये हे शिबीर पार पडले. न्यायाधीश, वकील व न्यायालयीन कर्मचारी अशा एकूण १२० जणांची नेत्र तपासणी करण्यात आली. नेत्र तपासणी करणाऱ्या डॉक्टर व तांत्रिक विभागातील सहकाऱ्यांचा बार असोसिएशनच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संयोजन उपाध्यक्ष ॲड. जयश्री कुटे यांनी केले.



# शहराला साजेशी न्यायालयाची इमारत होणार : आ. महेश लांडगे

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड न्यायालयाच्या इमारतीच्या उभारणीबाबत ''व्हीजन-२०२० '' मध्ये आम्ही घोषणा केली होती. याला आता मूर्त स्वरूप आले असून पिंपरी चिंचवड शहराच्या लौकिकाला साजेशी पिंपरी चिंचवड न्यायालयाची इमारत तयार होईल, असा विश्वास आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला. आधुनिक सोयी-सुविधांनी सुसज्ज अशी न्यायालयाची इमारत मोशी येथे उभारण्याच्या कामाचा प्रारुप आराखडा याचे संबंधित आर्किटेक्ट यांनी प्रोजेक्टद्वारे सादरीकरण केले. यावेळी न्यायाधीश ॲड. आर.एस. वानखेडे, ॲड. एम. जी. मोरे, ॲड. आर. एम. गिरी, ॲड. एन. आर. गजभिये, पिंपरी-चिंचवड बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. नारायण रसाळ, उपाध्यक्ष ॲड. जयश्री कुटे, सचिव ॲड. मंगेश नढे, ॲड. एस. बी. चांडक, ॲड. सतिश गोरडे, महाराष्ट्र आणि गोवा नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अतिश लांडगे, ॲड. मंगेश खराबे, ॲड. संजय दातीर-पाटील, ॲड. प्रसन्न लोखंडे, ॲड. दिनकर बारणे आणि सहकारी उपस्थित होते.

# वाहनचालक बिनधास्त तोडतात सिग्नल!

## पोलिस पावत्या फाडण्यात मग्न;मोशीतील देहू-आळंदी रोडवरील परिस्थिती

**मनीषा थोरात-पिसाळ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

देहू-आळंदी रोडवर कुदळवाडी चौक ते मोशीतील भारतमाता चौकापर्यंत पाच सिग्नल असून, त्यातील लक्ष्मीचौकातील सिग्नल बंदावस्थेत होते. तर उर्वरीत चार चौकातील सिग्नल वाहनचालकांकडून बिनधास्त मोडताना दिसून येत होते. त्यामध्ये दुचाकीस्वारांची संख्या अधिक दिसून आली. वाहतूक पोलिस पावत्या फाडण्यात मग्न असल्याचे चित्र पहायला मिळाले.



कुदळवाडीतील चौकात दुपारी १२.५५ वाजता सिग्नलचे लाल दिवे सुरु असताना चारही रस्त्यावरून वाहने सिग्नल तोडून ये-जा करत होते. याठिकाणी वाहतूक पोलिस नव्हते. तर लक्ष्मी चौकात १ वाजून २ मिनिंटानी पोहचले. या चौकात मोठी वाहतूक कोंडी असतानाही सिग्नल बंदावस्थेत असल्याचे दिसून आले. लक्ष्मी चौकात मार्केट असल्यामुळे मोठ्या प्रमाणात या रस्त्यावरून गाड्या ये-जा करतात. त्यामुळे वाहतूक कोंडी नित्याचीच होते. त्यात सिग्नल बंदावस्थेत असल्याने वाहनचालक अडव्या-तिडव्या कशाही गाड्या घालतात. त्यातून अनेकदा वाद होताना दिसतात. पुढचा चौक तबाजी बोराटे चौक म्हणजे जय भारत चौकात दुपारी १. वाजून ६ मनिंटानी पोहचल्यास अशी परिस्थिती पहायला मिळाली. सिग्नल असून, नसल्यासारखे होते. वाहनचालकांकडून लाल दिवा लागल्यानंतरही अवजड वाहने, दुचाकीस्वार अशा सर्व गाड्या पळत होत्या या ठिकाणी वाहतूक पोलिस नव्हते. मुख्य चौक म्हणजे भारतमाता चौक याठिकाणी विरूध्द दिशेने वाहन चालवण्याचे प्रमाण अधिक आहे. वाहतूक पोलिस पावत्या फाडण्यात मग्न असतात. याचाच फायदा वाहनचालक घेताना या चौकात दिसून येतात. विरूध्द दिशेने वाहनांबाबत परिसरातीन नागरिकांना अनेकदा तक्रारी केल्या आहेत. मात्र वाहतूक पोलिसांकडून दुर्लक्ष केले जाते. या चौकात मोठी वाहतूक कोंडी असते. कोणत्या तरी मार्गाने सिग्नल तोडून सर्वांच्या पुढे निघून जाण्याचा वाहनचालकांचा प्रयत्न असतो, तर काही वेळा लालदिवा सुरू असताना बिनधास्त वाहन घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत असताना अपघात होतात. यात चूक नसताना दुसर्या वाहनचालकांना अपघातास सामोरे जावे लागते. सिग्नलवर उभे असताना पुढे जाण्याच्या अतिघाईमुळे भांडणाचे प्रकारदेखील घडत असतात. सिग्नल सुरू असताना मागे उभे राहून सारखे हॉर्न वाजविणे, वाहनांना कट मारून पुढे जाण्याच्या घाईत दुसर्या वाहनांना धक्का लागणे असे प्रकार सर्रास होतात. अशा वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांकडून दंडात्मक कारवाई केली जाते. मात्र, एका वाहनावर कारवाई करीत असताना काही वाहनचालक सिग्नल तोडून सर्रास निघून जातात. एकाच वेळी अनेक वाहने सिग्नल तोडत असल्याने चौकात हजर असणारे वाहतूक पोलीस देखील हतबल होत आहेत. नाममात्र दंड; भिती कुणाला? सिग्नल तोडताना एखादा वाहनचालक वाहतूक पोलिसांच्या हाती लागला तर त्याच्यावर कारवाई होते. अनेक वेळा तर पोलीस कारवाई करू लागले की, पोलिसांवर दबाव आणून वाहन सोडवून घेतले जाते. परंतु जर दंड असलाच तर १०० किंवा २०० रुपये होतो. दंडाची भीती चालकांना वाटत नाही. सध्या तरुणांना १००, २०० रुपये तुटपुंजे वाटत असल्याने त्यांचे धाडस वाढलेले दिसून येत आहे.

### वाहतूक पोलिसांकडून दुर्लक्ष

» वाहतूक पोलिस पावत्या फाडण्यात मग्न असतात. याचाच फायदा वाहनचालक घेताना या चौकात दिसून येतात. विरूध्द दिशेने वाहनांबाबत परिसरातीन नागरिकांना अनेकदा तक्रारी केल्या आहेत. मात्र वाहतूक पोलिसांकडून दुर्लक्ष केले जाते. या चौकात मोठी वाहतूक कोंडी असते. कोणत्या तरी मार्गाने सिग्नल तोडून सर्वांच्या पुढे निघून जाण्याचा वाहनचालकांचा प्रयत्न असतो, तर काही वेळा लालदिवा सुरु असताना बिनधास्त वाहन घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत असताना अपघात होतात. यात चूक नसताना दुसर्या वाहनचालकांना अपघातास सामोरे जावे लागते.

# खासदार संजय सिंह यांच्या अटकेच्या विरोधात पिंपरीत आप तर्फे निदर्शने!

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर ठिय्या आंदोलन

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

आम आदमी पार्टीचे खासदार संजय सिंह यांच्या अटकेच्या निषेधार्थ पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर ठिय्या आंदोलन केले. काल दिल्लीमध्ये घडलेल्या घटनाक्रमानुसार आम आदमी पार्टीचे राज्यसभेचे खासदार संजय सिंह आणि काही पत्रकारांना दिल्लीमध्ये अटक करण्यात आली. भाजपा आणि मोदी सरकारच्या चुकीच्या धोरणांविरोधात




प्रखरतेने आवाज उठवणारे पत्रकार आणि विरोधकांवर ईडी, सीबीआय, आणि पोलीस यंत्रणा मार्फत त्रास दिला जात आहे. कालच्या अटकसत्रानंतर सरकारने देशामध्ये आणीबाणी लागू केली असल्याच्या चर्चे वर शिक्कामोर्तब केले असून त्याचा विरोध करण्याकरीता आम आदमी पार्टीचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरले आहेत असे सांगण्यात आले. आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत संजय सिंह यांच्यावरील कारवाईचा निषेध केला. यावेळी आपचे शहराध्यक्ष चेतन बेंद्रे, ब्रह्मानंद जाधव, सुरेश भिसे, अभिजीत सूर्यवंशी, संतोष इंगळे,सचिन पवार, वैजनाथ शिरसाठ, गोविंद माळी, अजय सिंग,प्रकाश हागवणे, कमलेश रणवरे, रोहित सरनोबत, इमरान खान, प्रदीप सूर्यवंशी, सुरेंद्र कांबळे, शुभम यादव, संजीव झोपे, स्मिता पवार, सरोज कदम, सुरेश बावनकर, यल्लाप्पा वालदोर, रफिक अत्तार, दमयंती नेरकर, कल्याणी राऊत, चंद्रमणी जावळे, सीमा बावनकर, प्रशांत कोळवले, संजीव झोपे आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# ऑनलाइन कर भरणा वाढला

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाने नागरिकांसाठी कर भरण्याची ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देऊन करामध्ये सवलतही दिली आहे. या सुविधेला मालमत्ताधारकांचा प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे २ लाख ५९ हजार मालमत्ताधारकांनी तब्बल ३७६ कोटी ७० लाख ८९ हजार रूपयांचा ऑनलाइन कर भरणा केला आहे. पिंपरी-चिंचवड शहरात निवासी, औद्योगिक, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमिनी अशा ६ लाख ७ हजार मिळकती आहेत. यामध्ये पहिल्या सहामहीत ३ लाख ६६ हजार ६३६ मालमत्ता धारकांनी ५८० कोटी कराचा भरणा केला आहे.यामध्ये तब्बल ३ लाख २२ हजार ७५८ निवासी मालमत्ता, त्यानंतर २९ हजार ७७८ बिगर निवासी, ८ हजार ३९१ मिश्र, २ हजार ७८७ औद्योगिक तर २ हजार ८७५ मोकळ्या जमीन असणाऱ्या मालमत्ता धारकांनी कराचा भरणा केला आहे.

मात्र, यामध्ये २ लाख ५९ हजार २४ मालमत्ता धारकांनी विविध ॲप आणि ऑनलाइन असा ३७६ कोटी ७० लाख ८९ हजार रूपयांचा कर जमा केला आहे. त्यानंतर ६३ हजार ३०५ जणांनी ७४ कोटी ५४ लाख रोख, १५ हजार ७४९ जणांनी ५७ कोटी ४३ लाख धनादेशाव्दारे, ४३३ जणांनी २६ कोटी ४६ लाख आरटीजीएसव्दारे, ७५६ जणांनी एनईएफटीव्दारे ४ कोटी ५४ लाख तर ४३५ जणांनी डीडीच्या माध्यमातून ३ कोटी ६४ लाखा रूपयांचा भरणा केला आहे.

# पुणे मेट्रोमध्ये थर्ड रेल सिस्टिम!

## मेट्रोला रुळांच्या शेजारून केला जाईल विद्युतपुरवठा

**पुणे|**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी|**
हिंजवडीच्या आयटी हबला शिवाजीनगरच्या मध्यवर्ती केंद्राशी जोडणाऱ्या पुणेरी मेट्रोमध्ये अत्याधुनिक 'थर्ड रेल सिस्टिम'चा वापर केला जाणार आहे. 'थर्ड रेल' प्रणालीचा अवलंब केल्यामुळे हिंजवडी ते शिवाजीनगर या २३.३ किलोमीटरच्या मार्गावर मेट्रोला रुळांच्या शेजारून आणि खालून विद्युतपुरवठा केला जाईल. या संपूर्ण मार्गावर कुठेही गाडीच्या बाजूने किंवा डोक्यावर इलेक्ट्रिकच्या खांबांचे किंवा तारांचे जाळे दिसून येणार नाही. पुणेरी मेट्रो हा पुणे शहराला अत्याधुनिक अशी 'थर्ड रेल' प्रणाली उपलब्ध करून देणारा पहिला प्रकल्प ठरणार आहे. अखंडित विद्युत पुरवठ्याच्या जोडीला 'थर्ड रेल' प्रणालीचा आणखी एक फायदा म्हणजे मेट्रो गाडीच्या बाजूला किंवा डोक्यावर खांब तसेच विद्युतवाहक तारा नसल्याने दृष्टीसौंदर्यात बाधा येत नाही. पारंपरिक ओव्हरहेड उपकरण प्रणालींपेक्षा हे तंत्रज्ञान वेगळे असून, पक्षी किंवा पतंग तारांमध्ये अडकून मेट्रोच्या विद्युतपुरवठ्याला होऊ शकणाऱ्या संभाव्य अडथळ्याला या प्रणालीमध्ये वाव राहत नाही, अशी माहिती पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी आलोक कपूर यांनी दिली. 'थर्ड रेल सिस्टिम'ला लाइव्ह रेल, इलेक्ट्रिक रेल किंवा कंडक्टर रेल असेही म्हटले जाते. ही एक अर्ध-सतत कंडक्टरद्वारे मेट्रो गाडीला विद्युत पुरवठा करण्याची अत्याधुनिक पद्धत आहे. ती मेट्रो रुळावर धावत्या दोन्ही बाजूने समांतर किंवा रुळांच्या मध्ये बसवली जाते. या प्रणालीच्या माध्यमातून संबंधित मेट्रो गाडीला अखंड वीज पुरवठा केला जातो. 'थर्ड रेल' प्रणालीमध्ये मेट्रोच्या नियमित दोन रुळांच्या समांतर तिसरा विशिष्ट पिवळ्या रंगाचे पट्टे मारलेला एकेरी रूळ टाकून, त्या मेट्रो गाडीला थेट खालून 'इलेक्ट्रिक ट्रॅक्शन पॉवर' पुरविली जाते. या पद्धतीने धावणाऱ्या गाड्यांना खालच्या बाजूला विद्युत संपर्कासाठी एक खास धातूची पेटी बसवण्यात येते, तिला 'शूज' असे म्हटले जाते. या शूजच्या माध्यमातून संबंधित मेट्रो गाडीला अखंड वीज पुरवठा होतो.




### महापालिकेने केले होते जाहीर!

» 'थर्ड रेल सिस्टीम'ला लाइव्ह रेल, इलेक्ट्रिक रेल किंवा कंडक्टर रेल असेही म्हटले जाते. ही एक अर्ध-सतत कंडक्टरद्वारे मेट्रो गाडीला विद्युत पुरवठा करण्याची अत्याधुनिक पद्धत आहे. ती मेट्रो रुळावर धावत्या दोन्ही बाजूने समांतर किंवा रुळांच्या मध्ये बसवली जाते. या प्रणालीच्या माध्यमातून संबंधित मेट्रो गाडीला अखंड वीज पुरवठा केला जातो. पुणेरी मेट्रो हा पुणे शहराला अत्याधुनिक अशी 'थर्ड रेल' प्रणाली उपलब्ध करून देणारा पहिला प्रकल्प ठरणार आहे. 'थर्ड रेल' प्रणालीचा आणखी एक फायदा म्हणजे मेट्रो गाडीच्या बाजूला किंवा डोक्यावर खांब तसेच विद्युतवाहक तारा नसल्याने दृष्टीसौंदर्यात बाधा येत नाही. पारंपरिक ओव्हरहेड उपकरण प्रणालींपेक्षा हे तंत्रज्ञान वेगळे असून, पक्षी किंवा पतंग तारांमध्ये अडकून मेट्रोच्या विद्युतपुरवठ्याला होऊ शकणाऱ्या संभाव्य अडथळ्याला या प्रणालीमध्ये वाव राहत नाही, अशी माहिती पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी आलोक कपूर यांनी दिली.

# वृक्ष संवर्धनसाठी ३६ लाखांची उधळण?

## खर्चाच्या निविदात गौडबंगाल असल्याची चर्चा

**पुणे|**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी|**
शहरात वेगवेगळ्या ठिकाणी लावण्यात आलेल्या झाडांचे संवर्धन आणि देखभालीसाठी महापालिकेचा ३६ लाखांच्या खर्चाचा प्रस्ताव वादग्रस्त ठरण्याची शक्यता आहे. कोणत्या भागातील आणि किती झाडांची देखभाल करायची, याची कोणतीही माहिती या प्रस्तावात नाही. विशेष म्हणजे गेल्या फेब्रुवारी महिन्यात काढण्यात आलेली ही निविदा मान्यतेसाठी आता स्थायी समितीपुढे ठेवण्यात आली आहे. त्यामुळे खर्चाच्या या निविदा प्रस्तावात गौडबंगाल असल्याची चर्चा सुरू झाली आहे. महापालिकेच्या वतीने शहराच्या विविध भागांत वृक्षारोपण केले जाते. महापालिकेच्या आकडेवारीनुसार शहरात ५१ लाख ३७ हजार ६३२ झाडांची नोंद आहे. त्यामध्ये ४३० विविध प्रजातींचे वृक्ष आहेत. महापालिकेकडून मेट्रो आणि मुळा-मुठा नदीकाठ संवर्धन, पुनरूज्जीवन आणि सुशोभीकरण योजनेअंतर्गत ७० हजार झाडांचे रोपण केले जाणार आहे. महापालिका प्रशासनाने यापूर्वी लावलेल्या झाडांच्या देखभाल आणि संवर्धनासाठी महापालिका प्रशासन ३६ लाखांचा खर्च करणार आहे. मात्र, हा खर्च वादग्रस्त ठरणार आहे. महापालिका प्रशासनाने २८ फेब्रुवारी ते ९ मार्च या दरम्यान त्यासाठीची निविदा प्रक्रिया राबविली होती. ती १० मार्च रोजी उघडण्यात आली. मात्र, ही निविदा मान्यतेसाठी नव्या आर्थिक वर्षात (२०२३-२४) ठेवण्यात आली आहे. कोणत्या भागात ही झाडे लावण्यात आली आहेत आणि किती झाडांचे संवर्धन, देखभाल करण्यात येणार आहे, याची कोणतीही माहिती या निविदेत देण्यात आलेली नाही. त्यामुळे ही निविदा संशयाच्या फेऱ्यात सापडली आहे. याबाबतचे ठोस उत्तर उद्यान विभागाच्या अधिकाऱ्यांकडेही नाही.



### निविदा संशयाच्या फेऱ्यात

» महापालिका प्रशासनाने २८ फेब्रुवारी ते ९ मार्च या दरम्यान त्यासाठीची निविदा प्रक्रिया राबविली होती. ती १० मार्च रोजी उघडण्यात आली. मात्र, ही निविदा मान्यतेसाठी नव्या आर्थिक वर्षात (२०२३-२४) ठेवण्यात आली आहे. कोणत्या भागात ही झाडे लावण्यात आली आहेत आणि किती झाडांचे संवर्धन, देखभाल करण्यात येणार आहे, याची कोणतीही माहिती या निविदेत देण्यात आलेली नाही. त्यामुळे ही निविदा संशयाच्या फेऱ्यात सापडली आहे. याबाबतचे ठोस उत्तर उद्यान विभागाच्या अधिकाऱ्यांकडेही नाही.

# व्यवस्थापन परिषद सदस्यांना वाटले टॅब्लेट

**पुणे|**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी|**
कागदाचा वापर कमी करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नव्या व्यवस्थापन परिषद सदस्यांना टॅब्लेट वाटप करण्यात आले आहे. मात्र सदस्यांना टॅब्लेट देऊन कागदांचा वापर खरोखरच कमी होणार का, हा कळीचा प्रश्न आहे. विद्यापीठाच्या मागील व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांना पहिल्यांदा टॅब्लेट देण्यात आले होते. व्यवस्थापन परिषदेच्या कामकाजात होणारा कागदांचा वापर कमी करण्याचा उद्देश त्यामागे होता. व्यवस्थापन परिषद सदस्यांना दिलेले टॅब्लेट त्यांचा कार्यकाळ संपल्यावर परत घेण्याबाबतचे धोरण विद्यापीठाने निश्चित केले नसल्याचे त्यावेळी समोर आले होते. या मुद्द्यावरून टॅब्लेट वाटपावर आक्षेप घेण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर आता पुन्हा एकदा व्यवस्थापन परिषद सदस्यांना काही दिवसांपूर्वीच नवेकोरे टॅब्लेट देण्यात आले. एका टॅब्लेटची किंमत सुमारे साठ ते सत्तर हजार रुपये असल्याचे सांगण्यात येते. टॅब्लेटचा योग्य पद्धतीने वापर केल्यास कागदांवरील खर्चही कमी होऊ शकतो. टॅब्लेट ही विद्यापीठाची मालमत्ता असल्याची जाणीव आहे. त्यामुळे व्यवस्थापन परिषदेचा पाच वर्षांचा कार्यकाळ संपल्यावर टॅब्लेट विद्यापीठाला परत केला जाईल किंवा कोणाला टॅब्लेट स्वतःसाठी हवा असल्यास त्याची मूल्यांकनानुसार विद्यापीठाला रक्कम द्यावी लागेल.

# शिवाजीनगर स्थानकाबाबत १५ दिवसांचा अल्टीमेटं!

## अन्यथा मुख्यमंत्र्यांना अडवू - माजी आमदार मोहन जोशी यांचा इशारा

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** प्रवाशांची सोय आणि वाहतुकीची सुरक्षितता लक्षात घेऊन शिवाजीनगर एसटी स्थानक पूर्ववत सुरू होण्यासाठी निर्णय घेतले जावेत अन्यथा मुख्य मंत्र्यांना अडवू, असा इशारा माजी आमदार आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष मोहन जोशी यांनी दिला आहे. शिवाजीनगर बसस्थानक लवकरात लवकर पूर्ववत सुरू व्हावे या मागणीसाठी प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष मोहन जोशी यांच्या नेतृत्वाखाली एसटीच्या विभागीय कार्यालयासमोर गुरुवारी आंदोलन करण्यात आले. आमचे छत्रपती शिवाजीनगर एसटी स्थानक परत द्या, पुणेकरांचा अंत पाहू नका, शासनाच्या बेपर्वाईमुळे पैसे आणि वेळ का वाया घालवायचा? असे फलक आंदोलकांनी हातात घेतले होते. एसटीचे विभागीय नियंत्रक कैलास पाटील यांना काँग्रेसच्या शिष्टमंडळाच्या वतीने निवेदन देण्यात आले. महामेट्रोच्या कामासाठी शिवाजीनगर एसटी स्थानकाचे स्थलांतर करण्यात आले. पुणे- मुंबई महामार्गालगत स्थलांतर झाल्याने वर्दळीच्या रस्त्यावर एसटी वाहतुकीची भर पडली. स्थलांतर तात्पुराने असल्याने वाहतुकीची गैरसोय सहन केली. महामेट्रोचे काम पूर्ण होऊन वर्ष झाले, अद्याप शिवाजीनगर एसटी स्थानक पूर्ववत सुरू झाले नाही. महामेट्रो आणि एसटी खात्यात समन्वय नाही. शिवाजीनगर एसटी स्थानकाचा आराखडा मुख्य मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे परिवहन खाते असल्याने त्यांच्याकडे सादर झाला. पण अद्याप निर्णय नाही. येत्या १५ दिवसात निर्णय होऊन एसटी स्थानक काम मूळ जागी सुरू व्हावे, असे निवेदनात म्हटले आहे. या आंदोलनात मोहन जोशी यांच्या नेतृत्वाखाली माजी मंत्री, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष रमेश बागवे, संजय बालगुडे, चंद्रशेखर कपोते, नुरुद्दीन सोमजी, नरेंद्र व्यवहारे, प्रवीण करपे, प्रशांत सुरसे, प्रथमेश आबनावे, रोहन सुरवसे-पाटिल, शाबीर खान, भरत सुराणा, चेतन अग्रवाल, नितीन जैन, सुरेश कांबळे, अयुब पठाण, शंकर थोरवे, अविनाश अडसूळ, उमेश काची, स्वाती शिंदे, ॲड.रोहिणी शिंदे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते.





### एसटी स्थानक पूर्ववत सुरू झाले नाही

» पुणे- मुंबई महामार्गालगत स्थलांतर झाल्याने वर्दळीच्या रस्त्यावर एसटी वाहतुकीची भर पडली. स्थलांतर तात्पुराने असल्याने वाहतुकीची गैरसोय सहन केली. महामेट्रोचे काम पूर्ण होऊन वर्ष झाले, अद्याप शिवाजीनगर एसटी स्थानक पूर्ववत सुरु झाले नाही. महामेट्रो आणि एसटी खात्यात समन्वय नाही. शिवाजीनगर एसटी स्थानकाचा आराखडा मुख्य मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे परिवहन खाते असल्याने त्यांच्याकडे सादर झाला पण अद्याप निर्णय नाही.

# बंदींना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी उपक्रम!

## कारागृह उद्योगनिर्मित पर्यावरण पूरक गणेशमूर्ती विक्रीतून १३ लाखांचे उत्पन्न

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** महाराष्ट्राचे लाडके दैवत गणपती, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी सुरू केलेला गणेशोत्सव संपूर्ण महाराष्ट्रात अतिशय श्रध्देने आणि धुमधडाक्यात गल्लोगल्ली व घरोघरी साजरा होतो. यावर्षीचा गणेशोत्सव सुध्दा असाच साजरा झाला. आजकाल शाडू मातीच्या इको फ्रेंडली मूर्तींना मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. ही मागणी लक्षात घेऊन महाराष्ट्रातील येरवडा मध्यवर्ती कारागृह, नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह तसेच धुळे जिल्हा कारागृह येथील बंदी कलाकार बांधवांनी परिश्रम घेऊन अतिशय सुबक सुंदर, रेखीव गणेशमूर्ती घडवल्या. कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या बंद्यांनी गणेशमूर्तींची निर्मिती करुन त्याची विक्री करणे उपक्रम राबवला. या माध्यमातून संबंधित कारागृहाच्याद्वारे एकूण १,०५३ गणेश मूर्ती विक्री करून १३ लाख २१ हजार रुपयांचे उत्पन्न कारागृहात प्राप्त झाले आहे. कलाकार बंदी बांधव कारागृहात आहेत हे लक्षात आल्यावर अपर पोलिस महासंचालक व महानिरीक्षक अमिताभ गुप्ता यांनी सदर उपक्रमास मान्यता दिली. डॉ. जालिंदर सुपेकर विशेष पोलिस महानिरीक्षक (कारागृह मुख्यालय), स्वाती साठे, कारागृह उपमहानिरीक्षक पश्चिम विभाग, यु. टी. पवार, कारागृह उपमहानिरीक्षक मध्य विभाग यांनीही विशेष मार्गदर्शन केले. शाडू मातीच्या इको फ्रेंडली सुबक गणेशमूर्ती बनवून खूप मोठ्या प्रमाणात विक्री झाली. त्यामध्ये कमळ गणपती, फेटा गणपती, बाल गणपती, आसन गणेश, जास्वंद गणेश, वकतुंड गणेश, स्वामी समर्थ गणेश, गरुड गणेश, लालबाग गणेश व दगडूशेठ गणपती इत्यादी अनेक प्रकारचे गपपती तयार झाले. नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहामध्ये एकून ९,७२,६४३ रूपये इतक्या रकमेच्या ५८० मूर्तींची विक्री झाली. तसेच येरवडा मध्यवर्ती कारागृहामध्ये १,७६,००० इतक्या रकमेच्या १७२ मूर्तींची विक्री झाली. अमरावती मध्यवर्ती कारागृहामध्ये १,२५,००० किंमतीच्या २०० मूर्तींची विक्री झाली. तसेच धुळे जिल्हा कारागृहात प्रथमच हा उपक्रम राबविला गेला होता. त्यांनी १,४४,७०० किंमतीच्या १०१ गणेश मूर्तींची विक्री केली. बंदी बांधवांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी हा अभिनव उपक्रम कारागृह विभागात राबविला जात आहे. यामुळे सकारात्मकता वाढण्यास मदत होत आहे. एकूणच गणेशमूर्ती तयार करण्यासाठी ३-४ महिने बंदी एकाग्रतेने काम करताना कारागृहामध्ये मंगलमय वातावरण निर्माण झालेले असते. या उपक्रमामुळे बंद्यांच्या कलागुणांना वाव मिळाला. कारागृहातून मुक्त झाल्यावर हे कौशल्य बंद्यांच्या व त्यांच्या कुटुंबाच्या उपजिविकेचे साधन होऊ शकते.



### मातीच्या इको फ्रेंडली सुबक गणेशमूर्ती

» कलाकार बंदी बांधव कारागृहात आहेत हे लक्षात आल्यावर अपर पोलिस महासंचालक व महानिरीक्षक अमिताभ गुप्ता यांनी सदर उपक्रमास मान्यता दिली. डॉ. जालिंदर सुपेकर विशेष पोलिस महानिरीक्षक (कारागृह मुख्यालय), स्वाती साठे, कारागृह उपमहानिरीक्षक पश्चिम विभाग, यु. टी. पवार, कारागृह उपमहानिरीक्षक मध्य विभाग यांनीही विशेष मार्गदर्शन केले. शाडू मातीच्या इको फ्रेंडली सुबक गणेशमूर्ती बनवून खूप मोठ्या प्रमाणात विक्री झाली. त्यामध्ये कमळ गणपती, फेटा गणपती, बाल गणपती, आसन गणेश, जास्वंद गणेश, वकतुंड गणेश, स्वामी समर्थ गणेश, गरुड गणेश, लालबाग गणेश व दगडूशेठ गणपती इत्यादी अनेक प्रकारचे गपपती तयार झाले.